दै. गोदातीर दि. 10/07/25

# विनयभंग करणाऱ्या ऑटोचालकाला १६ तासांत अटक करून दोषारोपपत्र दाखल

## भाग्यनगर पोलिसांची कामगिरी

नांदेड (प्रतिनिधी)- शहरातील भाग्यनगर पोलिसांनी मिशन निर्भया अंतर्गत महिला सुरक्षेबाबत एक महत्त्वपूर्ण कामगिरी केली आहे. एका ऑटोचालकाने महिलेचा विनयभंग केल्याप्रकरणी, पोलिसांनी घटनेच्या १६ तासांच्या आत आरोपीला अटक करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले आहे.

शनिवार, दि. ५ जुलै २०२५ रोजी सायंकाळी सव्वासात वाजेच्या सुमारास श्रीनगर, नांदेड येथील पंचशील ड्रेसेससमोर एका महिलेचा ऑटोचालकाने विनयभंग केल्याची घटना घडली. ही घटना सोशल मीडियावर व्हायरल झाल्यानंतर भाग्यनगर पोलिसांनी तात्काळ दखल घेतली.

त्यानंतर, नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी मिशन निर्भया अंतर्गत महिला व बाल सुरक्षा संबंधित गुन्ह्यांमध्ये तात्काळ कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार, भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांच्या मार्गदर्शनाखआली गुन्हे शोध पथकाने तात्काळ पीडित महिला आणि ऑटोचालकाचा शोध घेतला.

पथकाने सोशल मीडियावरील माहितीच्या आधारे पीडित महिलेचा शोध घेतला आणि त्यांच्या तक्रारीवरून भाग्यनगर पोलीस ठाण्यात भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ७४, ७५(२) अंतर्गत गुरनं-३९०/२०२५ नुसार गुन्हा दाखल केला. त्यानंतर, तपास अधिकारी सहाय्यक पोलीस निरीक्षक अनुपमा केंद्रे यांनी ऑटो (MH-26/N-5057) चा चालक आरोपी शेख इम्रान शेख हरुनसाब (वय २४, रा. नवी आबादी, नांदेड) याला शोधून अटक केली. आरोपीविरुद्ध सबळ पुरावे गोळा करून अवघ्या १६ तासांत न्यायालयात दोषारोप पत्रही दाखल करण्यात आले. यापूर्वी सिंदखेड, माहूर आणि रामतीर्थ पोलिसांनीही महिलांशी संबंधित गुन्ह्यांमध्ये २४ तासांच्या आत दोषारोपपत्र दाखल केलेले आहे. नांदेडचे पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी यापुढे ऑटोमधील महिला किंवा मुली प्रवाशांची कोणी छेडछाड करत असल्यास, तात्काळ जवळच्या पोलीस स्टेशनमध्ये किंवा ११२ डायल करून तक्रार करण्याचे आवाहन केले आहे. भाग्यनगर येथील पोलिसांच्या या उत्कृष्ट कामगिरीबद्दल पोलीस अधीक्षक अबिनाशकुमार यांनी सर्वांचे कौतुक केले आहे.